**नि.फौ.के. नं. ३९/२०१९**
**नि. क्र. ३६**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब**
नाव — रमेश महादेव यादव,
वय- ६१ वर्षे, व्यवसाय - सेवा निवृत्त शिक्षक ,
रा. निवे बु.सरोदेवाडी,ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे -**

१. सन २०१५ साली मी शिक्षक होतो. त्यादिवशी त्यावेळी माझी पत्नी सौ. रश्मी यादव देवरुख येथे आली होती. त्यावेळी तीने राणे होम्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रो.प्रा. जयसिंग गोपाळराव राणे यांचा वेल्हाळ कॉम्प्लेक्स या नवीन बांधकाम सुरु होत असलेल्या इमारतीतील फ्लॅट आणि गाळे विक्री बाबतचा बोर्ड वाचला. माझी पत्नी त्यांचे शिवाजी चौकातील कार्यालया येथे चौकशीकरता गेली. त्या ठिकाणी जयसिंग गोपाळराव राणे हजर होते. तीने त्यांच्याकडे त्या कॉम्प्लेक्समध्ये काही गाळे शिल्लक आहेत का याबाबत विचारले असता जयसिंग गोपाळराव राणे यांनी काही गाळे शिल्लक असल्याचे सांगीतले. जयसिंग गोपाळराव राणे यांनी तीला सांगीतले की, गाळा नं.९ उपलब्ध असून तो २०० स्के.फुटचा आहे व त्याची किंमत १२,५०,०००/- इतकी आहे. रोखीने घेतल्यास त्याची किंमती दहा लाख इतकी असेल असे सांगीतले. ती चर्चा करुन घरी आली.

२. तीने माझ्याशी या विषयी चर्चा केली. आम्ही दोघांनी रक्कम रु. १०,०००,००/- अशा रोख रकमेने गाळा घ्यायचे ठरवले. दि. ०७/०२/२०१५ रोजी मी आणि माझी पत्नी संध्याकाळी ०५.०० चे सुमारास जयसिंग गोपाळराव राणे यांच्या शिवाजी चौक येथील कार्यालयात आलो. माझ्या पत्नीने आमच्याकडे असलेली रक्कम रुपये दहा लाख ही रक्कम जयसिंग गोपाळराव राणे यांच्याकडे सुपुर्त केली. माझे आर.डी.सी.सी.बॅक देवरुख या बॅकेमध्ये असलेल्या माझ्या पगार खात्यातुन मी रक्कम रु. आठ लाख अशी टप्पयाटप्प्याने काढलेली होती व उरलेले दोन लाख माझ्या

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.02 18:53:24 +0530

पत्नीचे भाऊ संदिप शांताराम रसाळ यांच्याकडून उसनवार घेतलेले होते. अशा पध्दतीने आम्ही दहा लाख जमा केले होते. आम्ही जयसिंग गोपाळराव राणे यांच्याकडे रक्कम दिल्यानंतर त्यांनी आम्हाला राणे होम्स बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्सच्या रिसीटवर रेव्हेन्यु स्टॅम्प लावुन त्यांची सही करुन दहा लाख रुपये जमा केल्याची पोच पावती क्र. ४११ दिली. मला ती पावती दाखवल्यास मी ओळखु शकतो. मला आता दाखवलेली ४११ क्रमांकाची पावती तीच असून त्यावर माझ्या पत्नीचे नाव व खाली आरोपीची सही आहे. सदरची सही माझ्या समक्ष केलेली आहे. आम्हाला त्यांनी बांधकाम एका वर्षाच्या कालावधीमध्ये पुर्ण करुन गाळ्याचा ताबा दिला जाईल असे सांगीतले. त्यानंतर माझी पत्नी देवरुखला येऊन गाळ्याविषयी त्यांच्याकडे चौकशी करत होती.

३. साधारण एक वर्ष झाल्यानंतर आम्ही जयसिंग गोपाळराव राणे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांना गाळ्याबाबत विचारणा केली. त्यांनी आम्हाला सांगीतले की, हा प्रकल्प बंद केलेला आहे. मी तुमची रक्कम नुकसान भरपाईसह जानेवारी २०१८ पर्यंत देतो असे आम्हाला सांगीतले. आम्ही त्यांच्याशी फेब्रुवारी महीन्यात संपर्क साधला. त्यांनी आम्हाला रक्कम न देता वेळोवेळी टाळाटाळ केली. त्यांनी आमची फसवणुक केलेली आहे. सबब माझ्या पत्नीने दि. ०१/०३/२०१८रोजी देवरुख पोलिस ठाण्यात रितसर तक्रार दिली. माझ्या पत्नीने आरोपी विरुध्द रक्कम माघारी न देवुन आमची फसवणुक केल्याबाबत तक्रार दिली.

**सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.08.02 18:53:32 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग-१ देवरुख.**

**दिनांक ०१/०८/२०२३**